दुर्ग दुर्घट भारी

# किल्ले माहुलीगड



ई साहित्य प्रतिष्ठान ®

|| पुस्तक आठवे ||

# || किल्ले माहुलीगड ||

**प्रथमावृत्ती : ७ सप्टेंबर २०१२**

**लेखन व फ़ोटो : माधुरी नाईक, अरविंद नाईक**

**शहाजी महाराज चित्र : सुनील पाटील**

Cover Photo : V Hikerz

संपादक : नचिकेत जोशी

नकाशा: www.trekshitiz .com

संदर्भ: दुर्ग लेखक – सतिश अक्कलकोट

ही ई-पुस्तिका विनामूल्य वितरणासाठी असून कोणत्याही स्वरूपात हिची विक्री करण्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**©ई साहित्य प्रतिष्ठान २०१२**

**ई साहित्य प्रतिष्ठान**
**जी ११०२, ईटर्निटी**
**मॅरेथॉन चौक**
**ठाणे . ४००६०४**
मांडणी व सजावट: सुनिल सामंत

या पुस्तिकेतील साहित्याचे व प्रकाशचित्रांचे हक्क त्या त्या व्यक्तींकडे सुरक्षित आहेत

या पुढील पुस्तिका विनामूल्य मिळण्यासाठी आपला ई मेल आय डी कळवा :

**durgabhari@gmail.com**

या पूर्वीची ई पुस्तके विनामूल्य मिळवण्यासाठी भेट द्या



या भूमीला

एक महान सुपुत्र,

आणि त्या सुपुत्राला

स्वराज्याचा मंत्र देणाऱ्या

त्या दूरदर्शी महायोद्ध्याला

# शहाजी महाराजांना

ही पुस्तिका समर्पित

# **आडवाटांचे देणे**

नमस्कार दोस्तहो!!

रोजच्या धावपळीच्या आयुष्यातून निवांतपणा शोधत डोंगरदऱ्या पालथ्या घालायला सुरुवात करून तुम्हाला अनेक वर्षं झाली असतील. अस्सल ट्रेकरची वर्णने वाचून त्यानुसार स्वत:ला त्यात बसवण्याचा प्रयत्नही करून झाला असेल. मनात आलं की पाठीवर (कायम भरून तयार असलेली) सॅक टाकून भटकणं आता सवयीचं झालं असेल. सगळं जग क्रिकेट मॅच किंवा लग्नसमारंभ अशा मोहमयी गोष्टींत अडकले होते, किंवा थिएटरमधल्या उबदार खुर्च्यांवर बसून थंडगार वातावरणात, अगदी जवळ बसून (कुणाच्या हा प्रश्न तुम्हाला पडला नसणार याची आम्हाला खात्री आहे) वेळ घालवत होते, तेव्हा आपण स्वत: मात्र काय केलं होतं ते आठवतंय ना?

उजाडण्याची वाट बघत रेल्वे प्लॅटफ़ॉर्मवर रात्र काढली होती, वाटेतल्या एखाद्या दगडावरच पाठ टेकवली होतो, सूर्योदय-सूर्यास्ताचे फोटो घ्यायला छाती फुटेपर्यंत कड्याच्या दिशेने धावला होतो, बाहेर पडणाऱ्या पावसाच्या आणि रातकिड्यांच्या किरकिऱ्या म्युझिकच्या साथीने गुहेत ट्रेकी गाण्यांची मैफल भरवली होती. अंधारात, पाऊस तोंडावर झेलत राजांचे मावळे असल्यागत नदी-नाले-

चिखलगाळ तुडवला होता (आणि मुक्कामाला पोहोचलो तेव्हा पायातून बूट शेवटी ओढून काढावे लागले होते!)."घरी आराम करायचं सोडून इथे मरायला यायला कुणी सांगितलं होतं" हा प्रश्न जेव्हा जेव्हा पडला होता तेव्हा पुढच्याच वळणावर एखाद्या झऱ्याने, एखाद्या बुलबुल-ससाण्याच्या शर्यतीने, एखाद्या नाजूक फुलाने किंवा आकाशातल्या नक्षत्रांच्या सड्याने त्याचं उत्तर परस्पर देऊन टाकलं होतं.(पुढे पुढे मात्र हा प्रश्न कधी पडलाच नाही!) कुठल्याही ट्रेकमध्ये मिसळ-पाव खाल्ला नाही आणि एकदा तरी निसर्गाच्या सान्निध्यात "दान" केलं नाही तर ट्रेक निष्फळ ठरतो, तसेच ट्रेकमध्ये नैसर्गिक पाणीसाठे सोडून इतरत्र आंघोळ करणे हे पाप असते या विचारांवर निष्ठा ठेऊन राजांच्या जयघोषात कधी तोरणा-राजगड, तर कधी रतनगड-हरिश्चंद्रगड, कधी पन्हाळगड-विशाळगड तर कधी खांडस-भीमाशंकर अशा वाऱ्या केल्या होत्या! (आणि फावल्या वेळात ट्रेकिंगने आम्हाला काय दिलं, किंवा मी ट्रेक का करतो अशा चर्चांमध्येही सहभागी झालो होतो!)

शहरातल्या रंगीबेरंगी दुनियेपेक्षा सह्याद्रीच्या सहवासातली रंगाची दुनिया अधिक मोहक आणि अस्सल आहे हे आपण केव्हाच स्वत:शी कबूल केलं आहे! आणि म्हणूनच एखादा चित्रपट पुन्हा पुन्हा बघावा तसं दर उन्हाळा-पावसाळा-हिवाळयात त्याच ओढीने आजही तेच किल्ले, तेच उतार, तेच बुरूज, तेच दरवाजे, त्याच कातळ-कपारी, त्याच अवघड पायवाटा आपण तुडवत असतो. अर्थात "सर्व प्रकारचे विरोध" (सूज्ञांस अधिक सांगणे नलगे!) मोडून काढून हे करावं लागतं हे खरंच! पण "हे कार्य" व्हावे ही तो श्रींचीच इच्छा!! कदाचित या ट्रेकिंगमुळेच आपण दैनंदिन जीवनातसुद्धा ट्रेकरच्या खाक्यानेच वागतो. कचरा इकडे-तिकडे टाकत

नाही, पाणी जपून वापरतो, खिशात सदैव एक टॉर्च घेऊन फिरतो, कशाशीही काहीही तोंडी लावून खाऊ शकतो, कुठेही adjust करू शकतो, इतर पर्यटनस्थळांच्या ठिकाणी चाललेला थिल्लरपणा पाहून आपलं रक्त खवळतं इ. इ.

"दुर्ग दुर्गट भारी" या नव्या ई-पुस्तकांच्या मालिकेत आम्ही आपल्यासोबत करणार आहोत महाराष्ट्रातल्या परिचित-अपरिचित गडकोटांची ई-यात्रा! आपण नवखे असाल तर मार्गदर्शक म्हणून आम्ही आपल्या सोबत असू आणि अट्टल भटके असाल तर आपल्यासाठी ही जुन्या सदाबहार आठवणींची यात्रा असेल. एका पुस्तिकेत एक-दोन किल्ले, त्यांची ऐतिहासिक, भौगोलिक माहिती, वैशिष्ट्ये, प्रवासाचे तपशील इ सर्व माहितीने परिपूर्ण अशी ही मालिका असेल. दुर्गभ्रमंतीचं एक रेकनर म्हणूया हवंतर!

आपल्यासारख्या अट्टल भटक्यांच्या स्वागताला आडवाटाही सजवून सदैव तयार असणाऱ्या आपल्या लाडक्या सह्याद्रीमधल्या दुर्गभ्रमंतीला - चला, निघूया!

**नचिकेत जोशी**

**(संपादक, दुर्ग दुर्गट भारी)**

दुर्गबहाद्दरांचे स्वागत.

वरुण राजाच्या कृपेने सगळा आसमंत हिरवागार झाला. अशा वेळी एखादा सुंदर परिसराचा गड बघावासा वाटला तर मुंबईच्या (आणि नाशिकच्या) लोकांना अत्यंत सोयीचा गड म्हणजे माहुली गड. वीस तीस मैलांवरूनही हा गड अगदी वेगळा उठून दिसतो. सह्याद्री पर्वत जणू आपली अक्राळविक्राळ बोटं उंच करून आपल्याकडे लक्ष वेधून घेतो आहे असं वाटतं. तर चला आज माहुली गडाकडे आपला मोहरा वळवू.

पण जरा जपून गड्यांनो. हा परिसर बिबट्यांसाठी प्रसिद्ध आहे. शेर शिवाजीच्या वडलांचा हा बालेकिल्ला. तेव्हा तो कितीही सुंदर भासला तरी गंमत म्हणून पिकनिकचं ठिकाण समजून कोणी जाऊ नये.

आपल्यापैकी कोणी यापुर्वी इथे गेलां असाल तर आपले अनुभव कळवा. आणि या पुढे जाणाऱ्यांनीही खुप माहिती जमा करून आणि फोटो काढून पाठवा.

तेवढीच पुढच्या लोकांना मदत.


# किल्ले माहुली



भल्या पहाटे उठून शेतजमिनीची मशागत करणारे शेतकरी  कुठे, वाल, हुरडा यासारख्या पिकांनी हिरवठलेली शेत आणि खरपूस भाजून निघणाऱ्या शेतातल्या धुराआडून मिणमिणणारा सूर्य...एखाद्या तैलचित्राप्रमाणे  दिसणारं हे वातावरण वास्तव स्वरुपात पाहायचं असल्यास एक दिवसाचा किल्ले माहुलीचा ट्रेक प्रत्येकानेच करावा. अनेक सुळके असलेला लांबलचक असा हा डोंगर माहुली नावाने ओळखला जातो. मुद्दाम जाऊन पहावे असे हे ठिकाण कोणाही माणसाला आपल्या निसर्गसौंदर्याने वेड लावते. मुंबईहून सुमारे ९० किमी. अंतरावर असल्याने या ठिकाणी अगदी सकाळच्या ट्रेनने मध्य रेल्वेच्या आसनगाव स्थानकापर्यंत पोहोचायचं. गरमागरम कांदा भजी आणि चहावर मनसोक्त ताव मारायचा. सुमारे पाच-सहा  कि. मी. अंतरावरच्या माहुली गडाकडे आपला मोर्चा वळवायचा. किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत जाण्यासाठी एस.टी. बसेस अथवा रिक्षांची सुविधा आहे. पण या ठिकाणचं



निसर्गसौंदर्य उपभोगत गडापर्यंत पोहोचण्यात खरी मजा येते ती पायी प्रवास करताना. काळ्याशार डांबरी रस्त्यावरून चालताना पक्ष्यांचे मधुर स्वर ऐकत, रानातल्या पानगळीच आगळवेगळ सौंदर्य उपभोगत आपण केव्हा गडाच्या पायथ्यापर्यंत येऊन पोहचतो ते कळतही नाही. इथल्या ओढ्यावरचा पूल ओलांडला कि डावीकडे एक जुनी विहीर लागते. समोरच पुलाच्या अगदी जवळच हनुमानाचं छोटेसं मंदिर लागत. इथून पुढे गेल्यावर पायथ्याशी असलेल्या शंकराच्या, माहुली देवीच्या मंदिर परिसरात आपण पोहचतो. जंगलातल्या शांत, मोकळया आणि अतिशय सुटसुटीत अशा मंदिर परिसराकडे दुरून पाहताक्षणी कोणीही त्याच्या मोहात पडतं. वाऱ्याच्या प्रत्येक झुळूकेसोबत करवंदीच्या फुलांच्या येणाऱ्या मंद वासाने शरीरातला सारा थकवा क्षणात निघून जातो.



धाडसी उत्साही तरुणांना आणि गिर्यारोहकांना माहुलीच्या किल्ल्या शेजारचा प्रत्येक सुळका वेगळंच आव्हान देतो. तर इथल्या मंदिराचा शांत परिसर अबालवृद्धांना आकर्षित करतो. ट्रेकिंगसाठी गडावर अनेक उत्तम जागा आहेत. सकाळ-सायंकाळच्या वेळी तर इथलं वातावरण खूपच जादूमयी असतं. गडावर ट्रेकिंगला जायचं झाल्यास मात्र सकाळी ७-८ च्या सुमारास पायथ्याशी हजेरी लावावी लागते. दोन अडीच तासांचा थकवा आणणारा प्रवास केल्यानंतर

आपण गडावर पोहचतो. गडावरून दिसणारं अप्रतिम निसर्गसौंदर्य पाहून मनाला आणि शरीराला पुन्हा नवी उभारी येते. भंडारगड , माहुलीगड आणि पळसगड अशा तीन टेकड्यांत विभागलेल्या या परिसरातही मोडकळीला आलेले अनेक ऐतिहासिक अवशेष आजही आपल्याला पाहायला मिळतात.

*दुरून गोंडस दिसणारे डोंगर जवळून अक्राळविक्राळ दिसतात*

**माहुली टॉप वरून भटोबा आणि वजीर यांचे दर्शन**





# इतिहास



***"माहुलीचा किल्ला म्हणजे तळ कोकणची राजधानीच. तिच्या ( माहुली मराठ्यांच्या ताब्यात असताना) भोवती मोगलांची ठाणी टिकून राहणे अशक्य. किल्ल्यावर रसद सरंजाम मुबलक. किल्ला अतिशय मजबूत. "***

माहुलीचे हे वर्णन सन १६८९ मध्ये कोकणातील मोगल अधिकारी मातबरखान याने औरंगजेबाला पाठविलेल्या अर्जीमध्ये केले आहे. देवगिरीच्या रामदेवरायचे सैन्य माहुली किल्ल्याच्या आश्रयास आले असताना तिथे ठाणे कोकणचा नागरशा राज्याशी युद्ध होऊन रामदेवरायाचा प्रधान हेमाड पंडिताचा पराभव झाला. असा एक उल्लेख आहे.

छत्रपती शिवाजीमहाराजांची बालपणीची सहा सात वर्षं शिवनेरी, पेमगिरी आणि

माहुलीगडावर गेली. त्यामुळे शिवप्रेमी महाराष्ट्राचे या गडांवर विशेष प्रेम आहे.



माहुलीचे प्रचंड डोंगर- सुळके पाहून कुणाच्याही छातीत धडकीच भरेल आणि यामुळेच शहाजीराजेंनी निजामशाही वाचविण्यासाठी जी धडपड केली त्यात अखेर या दुर्गाचाच आश्रय घेतला होता. मोगलांनी देवगिरी जून १६३६ मध्ये जिंकून निजामशाही बुडविली. पण शहाजीराजांनी निजामशाही वंशाच्या मूर्तिजा नावाच्या लहान मुलाला गादीवर बसून निजामशाही नष्ट झाली नाही असे जाहीर केले. आदिलशाहीच्या जोरावर शहाजीराजांनी दोन वर्षाहून अधिक काळ निजामशाही टिकवली. पुढे आदिलशाहनेच मोगलांपुढे शरणागती स्विकारली. दरम्यानच्या काळात शहाजीराजेंनी मंबाजी भोसले ह्यांना आपल्या पक्षात घेऊन माहुलीचा ताबा घेतला. पुढे दिल्लीच्या मोगल फौजा व आदिलशाही सेना संयुक्तपणे निजामशाही बुडवण्यासाठी प्रयत्न करू लागल्या. त्याच सुमारास शहाजींनी कठीण परिस्थितीत बळकट आश्रयस्थान म्हणून माहुलीला मुक्काम हलवला. त्यांनी पेमगिरीहून मुर्तिजाला माहुली गडावर आणले. तेव्हा त्यांच्यासोबत जिजाबाई आणि बाल शिवराय होते. खानजमान म्हणजे महाबतखानाच्या मुलाने माहुलीला वेढा दिला. नंतर मोगलांच्या मदतीसाठी आदिलशाही सरदार रणदुल्लाखान माहुलीला येऊन पोहोचला.

शहाजीराजांनी पोर्तुगीजांकडे मदत मागितली, पण त्यांनी नकार दिला असता शहाजींनी शरणागती पत्करली आणि माहुलीवर मोगलाचे निशाण चढले. रणदुल्लाखान आणि शहाजीराजे यांचे सख्य होते. त्यामुळे शहाजीराजेंना आदिलशहाच्या पदरी रुजू करून कर्नाटक प्रांतावर नेमणूक केली.



पुढे शिवाजी राजांनी ९ जानेवारी १६५८ रोजी हा किल्ला मोगलांकडून परत मिळवला. पण सन १६६१ मध्ये तो मोगलांना परत द्यावा लागला. लगेच तो परत जिंकून घेतला गेला.

माहुलीचे दोन खोगिरामुळे तीन भाग पडले आहेत उत्तरेचा पळसगड, मधला माहुलीगड आणि दक्षिणेचा भंडारगड. माहुली हा एकच दुर्ग नाही तर एकूण तीन जोडकिल्ले आहेत. या तीन गडांमुळे माहुलीचे ठाणे अभेद्य झाले होते. पण सन १६६५ च्या पुरंदरच्या तहात हे दुर्गत्रिकुट परत गमवावे लागले. त्यानंतर मोगलांचा मनोहरदास गौड हा धोरणी कर्तबदार सरदार माहुलीवर कारभार पाहू लागला. त्याने गडावर बरेच बांधकाम करून घेतले. फेब्रुवारी १६७० मध्ये खुद्द शिवाजीराजांच्या नेतृत्त्वाखाली माहुलीवर हल्ला केला गेला. पण मनोहरदासाच्या दक्षतेमुळे आणि पराक्रमामुळे मराठ्यांचा दणदणीत पराभव झाला.

तब्बल हजार मावळे मोगलांनी कापून काढले. परंतू शिवाजी महाराज स्वस्थ बसणार नाहीत याची मनोहरदासाला कल्पना होती. त्यामुळे या यशानंतरही पुरेशी माणसे आणि युद्धसामुग्री अभावी यापुढे किल्ल्याचे रक्षण करणे आपल्या आवाक्याबाहेर आहे असे सांगून मनोहरदास गौडने किल्लेदारी सोडली. त्याच्या जागी अल्लावर्दीखान हा नवा किल्लेदार रुजू झाला.



मागील पराभवाचा वचपा काढण्यासाठी शिवाजी राजांनी जून १६७० च्या पहिल्या आठवडयात माहुलीवर हल्ला केला परंतु अपयश पदरी आले.

नंतर १६ जून १६७० रोजी माहुलीवर पुन्हा हल्ला केला. मोगल-मराठ्यांच्यात लढाई झाली. अल्लावर्दीखान लढाईत मारला गेला. राजांनी भंडारगड, माहुलीगड आणि पळसगड हे त्रिकूट स्वराज्यात सामील करून घेतले. या विजयाने मोगलांना मोठाच धक्का बसला कारण हा किल्ला अभेद्य समजला जात होता. यानंतर महाराजांची दहशत इंग्रजांमध्येही पसरली.

संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत मोगलांना माहुली किल्ला जिंकता आला नाही, पण



त्यांच्या वधानंतर व्दारकोजी या किल्लेदाराने फितुरीने किल्ला मोगलांच्या ताब्यात दिला व त्यांची चाकरी पत्करली. त्यानंतर प्रयत्न करूनही मराठ्यांना हा किल्ला सन १७३५ पर्यंत जिंकता आला नाही. गडावर हल्ला चढवून जिंकून घेणे अवघड असल्यामुळे भेदनीतीचा वापर करुन माहुली गड ताब्यात घेतला.पुढे दुसऱ्या बाजीरावाने जून १८१७ मध्ये इंग्रजांशी झालेल्या तहानुसार माहुली किल्ला इंग्रजांच्या ताब्यात दिला. असा या किल्ल्याचा इतिहास आहे.



# माहुलीगड एक सौंदर्यनिधान



# प्रेक्षणीय स्थळे




आसनगाव मार्गे माहुली गावातून निघाल्या पासून दोन-अडीच तासात आपण कडयाला लावलेल्या शिडीजवळ येऊन पोह्चोचतो. सोबत गावातून वाटाड्या घेतल्यास उत्तम. शिडी चढून आपण पडलेल्या तटबंदीमधून गडामध्ये प्रवेश करतो. दोन अडीच तासांचा थकवा आणणारा प्रवास केल्यानंतर गडावरून दिसणारं अप्रतिम निसर्गसौंदर्य पाहून मनाला आणि शरीराला पुन्हा नवी उभारी येते. शिडीच्या वाटेने किल्ल्यावर आल्यावर समोरच पाण्याचे टाके आहे. येथून थोडं पुढे गेल्यावर एक वाट डावीकडे तळयाच्या दिशेने वळते. सरळ वर जाणारी वाट पकडल्यावर, परत उजवीकडे वळून खाली जाणारी वाट महादरवाजा व पळसदुर्गाकडे जाते व सरळ जाणारी वाट नमाजगीर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिंतीकडे जाते. तेथेच बाजूस एक उर्दू शिलालेखही आहे. पुढे कड्यावर गेल्यास काही वाड्यांचे अवशेष व तानसा जलाशयाचे नयन मनोहर दृश्य पहावयास मिळते.



मागे वळून महादरवाजाकडे जातांना आणखी एक पाण्याचे टाके आहे. तेथेच उजवीकडे खोदीव पायऱ्या दिसतात.  पायऱ्यांनी थोड खाली उतरावं. उजवीकडे खडकात खोदलेल्या तीन देवड्या ( गुहेसदृश खोली)  दिसतात. त्यातील जागा भरपूर मोठी असून दहा-पंधरा जणांना मुक्काम करता येण्यासारखी आहे. तिथून पुढेच माहुलीचा महादरवाजा आहे. दरवाज्याची अवस्था वाईट आहे. दरवाजाच्या लगतचे  बुरुज व तटबंदी बऱ्या अवस्थेत टिकून आहेत. दरवाजातून हरिश्चंद्र, आजोबा, तानसा खोरे असा प्रचंड मुलुख दिसतो.  इथून खाली उतरणारी वाट माहुली गावात उतरते . पण वाट खूप खराब आहे. पायऱ्या चढून वर आल्यावर उजव्या बाजूस टाकी आणि आंब्याच्या झाडाखाली शंकराची पिंड दिसते. बाजूलाच किल्ल्याचा ईतिहास दर्शविणारा फलक लावला आहे. त्याच्या जवळूनच एक पायवाट जाते ती छोटा माहुली कडे. दहा- पंधरा मिनिट चालून समोर छोटा महुलीचे दर्शन होते. माहुली आणि छोटा माहुली यांच्या


## कल्याण दरवाजाजवळचा शिलालेख



मधील खिंडीतून खाली उतरून छोटा माहुलीला वळसा घालून आटगावाकडे जाता येते.

शिडीच्या वाटेने आल्यावर डावीकडे एक वाट जंगलात जाते. पुढे गेल्यावर पाण्याचे मोठे तळे आहे. उन्हाळयात तळयाला पाणी नसते. वाटेतच शंकराची पिंड ( माहुलेश्वर मंदिर ) आहे. जवळच वाड्यांचे काही अवशेष आढळतात. पुढे गेल्यावर एक स्त्री योद्ध्याचे शिल्प पाहायला मिळते.पुढे जांभळाचे रान आहे. चढ चढल्यावर वाट खिंडीत जाऊन पोहोचते. खिंडीतून खाली उतरल्यास पिवळी गावात जाता येते. खिंडीच्या थोडे वर गेल्यावर उजव्या बाजूस खाली उतरल्यावर थोडे शोधल्यास गडाच्या पोटात लपलेला कड्यालगतच कल्याण दरवाजा दिसतो. या दरवाज्यातून उतरावयाचे झाल्यास प्रस्तरारोहणाची गरज पडते. खिंडीतून वरती पुढे चालत गेल्यावर झुडपात लपलेलं पाण्याचं मोठ टाकं आढळते. इथे एक भुयार असल्याचे जाणवते. त्याचा शोध घ्यायला हवा.





येथून पुढे जाणारी वाट गडाच्या दक्षिण बाजूस येते. गडाच्या टोकावरून समोर भंडारगड आणि खाली नवरा, नवरी, करवली व

भटोबा या सुळक्यांचे जवळून पण वरून दर्शन होते. तेथे उतरण्यास इथून वाट नाही. समोरच उजवीकडे असणाऱ्या डोंगररांगेवर वजीरचा सुळका दिसतो.



गडावरील पाण्याची टाकी, देवड्या, तळे सार काही थक्क करून टाकत. पूर्ण गड फिरण्यासाठी सुमारे अडीच ते तीन तासांचा कालवधी लागतो. सभोवतालच्या परिसराचे दृश्य अतिशय रमणीय असते. माहुलीचा विस्तार मोठा आहे आणि गडावर वाड्यांचे बरेच अवशेष असून जांभूळ, हिरडा, करवंद, बांबू, केतकी इत्यादी झाडांचे हिरवे गार जंगल पसरेले आहे. गडावर जंगली प्राणी असल्यामुळे माहुलीवर फिरताना सावधगिरी बाळगावी. गडाच्या आवारात फिरून आणि इथे येणारे अनुभव घेऊन अंधार पडायच्या आत पुन्हा माघारी परतायचं. स्वातंत्र्यानंतरही माहुली गड मरगळलेल्या अवस्थेत पडून होता. त्याला नवचैतन्य देण्याचे काम मुंबईच्या दुर्गमित्र , कल्याण- डोंबिवलीच्या निसर्ग गिरीभ्रमण, गिरीविराज , माहुली निसर्ग गिरीभ्रमण आदि संस्थांनी केले.

माहुलीला परिसराला भेट देण्यासाठी एक दिवस पुरेसा होतो.  पण या ठिकाणच्या अन्य पर्यटन स्थळांना भेट द्यायची असेल तर आणखी एक दिवस लागतो. आसनगाव मध्ये पर्यटकांच्या राहण्याची उत्तम सोय होऊ शकते. मानस मंदिरम हे नवं कोर अत्यंत भव्य जैन मंदिर पाहण्यासारखं आहे. संगमरवराच्या दगडावर आणि मंदिराच्या घुमटावर असलेल्या अप्रतिम नक्षीकामामुळे हे मंदिर पर्यटकांच मन जिंकत आहे. तसेच तानसा, भातसा, वैतरणा धरण आणि खडवली  नदी परिसरातलं दत्त मंदिर हि या भागातील अन्य प्रेक्षणीय ठिकाणही आहेत






# पोहोचण्याच्या वाटा

मुंबई - नाशिक लोहमार्गावरील आसनगाव गाठावे. सीएसटी- दादरहून आसनगाव लोकल असते. दादरहून फ़क्त सव्वा तास लागतो. इथून पाच-सहा  किमी अंतरावरील गडाच्या पायथ्याशी असणार्या माहुली या गावी पायी अथवा रिक्षाने / एस.टी. बसेस जाता येते. गडाच्या पायथ्याशी महादेवाचे सुंदर मंदिर आहे. रात्री तेथे राहण्याची सोय होते. डाव्या बाजूस पावसाळ्यात सुंदर धबधबा असतो.  इथून उजवीकडे ओढा पार करून दोन-अडीच तास खडा चढ चढून जावे लागते.

तसेच वाशिंद मार्गे जाता येते. परंतु हि वाट खूप अवघड असल्याने प्रस्तरारोहणाचे साहित्य जवळ असणे गरजेचे आहे.



# इतर माहिती

जेवणाची सोय :

किल्ल्यावर जेवणाची सोय आपणच करावी. माहुली गावातील कृष्णा आगीवले ( ०२५२७६८२४५६, ९२७१३८५७०१) यांच्याकडे अगोदर सांगितल्यास नाश्ता , जेवणाची रहाण्याची सोय होऊ शकते.

पाण्याची सोय :

किल्ले माहुलीवर अगदी वरती देवड्यांसमोर बाराही महिने भरलेले पाण्याचे टाके आहे. येथील पाणी पिण्यासाठी योग्य आहे. तो पर्यंतच्या प्रवासात पाणी आपल्या सोबत ठेवावे.

जाण्यासाठी लागणारा वेळ :

आसनगाव मार्गे दोन अडीच तास लागतात. कल्याण दरवाजा मार्गे ६ ते ८ तास लागतात.



## ** दहा कमांडमेंट्स **




(चित्र सौजन्य : सह्याद्री मासिक)

ट्रेक म्हटलं की उमेदीच्या पहिल्या काही वर्षांतला बराचसा वेळ सॅक भरण्यातच जातो. मला आठवतंय, माझ्या एका मित्राने एका ट्रेकला चक्क बादली आणली होती! खायला, चघळायला काय घ्यावं इथपासून कपडे, शूज कोणते घालावेत, आयत्यावेळेला उपयोगी पडतील अशी साधने कोणती, रानामधल्या वनस्पती-झाडांचे ट्रेकमधले उपयोगी गुणधर्म याबद्दल माहिती देणारा लेख आपण "दुर्ग दुर्गट भारी"मध्ये कायमस्वरूपी प्रकाशित करणार आहोत. पुढच्या वेळी निघताना याची एक प्रिंट घेऊन ठेवा की झालं!

१) ज्या किल्ल्यावर जाणार असाल तिथल्या वाटा, आजूबाजूच्या भूभागाची माहिती, चढायला लागणारा वेळ, राहण्याची सोय याची माहिती गोळा करा आणि घरच्यांनाही देऊन ठेवा.

२) प्रमाण नकाशे मिळालेच तर प्रिंट घेऊन जा. वाटा शोधण्यात त्यांचा खूप उपयोग होतो. कधी हरवलात तर एकाच जागी थांबा. शिट्टी वाजवत रहा. म्हणजे शोधणारे तुम्हाला शोधतील.

३) आपल्याला संपूर्ण वेळ उचलता येईल इतपतच सॅक भरा. आवश्यक त्याच गोष्टी सॅकमध्ये असाव्यात. उदा, ज्या पातेल्यात चहा करायचा त्यातच तांदूळ भिजवता येतील, अथवा एकच ताट झाकण म्हणूनही ठेवता येईल आणि तांदूळ धुवायला सुद्धा वापरता येईल.

४) कुठल्याही ट्रेकमध्ये टॉर्च, काडेपेटी, (मुक्कामी/नाईट ट्रेकमध्ये मेणबत्त्या) चाकू, (स्विस नाईफ असल्यास उत्तम), रद्दी पेपर, दोर, ओडोमॉस या गोष्टी घ्याच. लांबवर ऐकू येणारी एक शिट्टीही ठेवा.

५) पायामध्ये ग्रिप असणारे शूज आवश्यक. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, चढण-उतरण शूजच्या नव्हे तर आपल्या पायांच्या बळावर करणार आहोत हे ध्यानात ठेवावे. त्यामुळे आत्मविश्वासाने पाऊल टाकणेही आवश्यक आहे. पण तरीही, निसरड्या, उभट भूभागावर शूज अतिरिक्त मदत देतात.

६) मुक्कामी ट्रेकमध्ये झोपण्यासाठी कॅरीमॅट उत्तम! वजनाला हलक्या, आटोपशीर असतात. झोपण्यापुर्वी आग पेटवली असेल तर पूर्ण विझवा.

७) जेवण शिजवून खाण्याची वेळ आल्यास ट्रेकची मजा अजून वाढते. बाहेर पाऊस कोसळतोय, गुहेमध्ये चुलीचा सगळा धूर भरून राहिलाय, अंधारात, टॉर्चच्या प्रकाशात जेवण शिजतंय,

त्याचा घमघमाट भूक चाळवतोय, पातेली कुणी घासायची यावर एका बाजूला वाटाघाटी सुरू आहेत.. अर्थात हल्ली रेडी टू कूक ची पॅकेट्स उपलब्ध असतात. नसल्यास पोहे, मॅगी, डाळ/पिठलं-भात. मुगाच्या डाळीची खिचडी हे पदार्थ भूकही भागवतात आणि कमी वेळात तयारही करता येतात. फावल्या वेळात चघळण्यासाठी खजूर, बिस्कीटे, चिक्की सुद्धा घेऊन ठेवा. जांभळे, करवंदांच्या मोसमातला ट्रेक असेल तर मग काय वर्णावी धम्माल महाराजा?

८) प्रत्येकाकडे किमान एक मोठी बाटली पाणी असणे आवश्यक. उन्हाळ्यात २ सुद्धा कधीकधी पुरेनाशा होतात. शिवाय बाटलीचा आपत्कालिन परिस्थितीत 'दाना'साठीही उपयोग होतो तो वेगळाच! पाणी भरपूर प्या. शरीराला पाण्याचा अभाव होऊ देऊ नका. तहान लागण्याची वाट बघू नका.

९) आपल्या आजारांबद्दल, ऍलर्जीबद्दल प्रत्येकाला माहिती असतेच. त्यानुषंगाने औषधे बरोबर ठेवा. एसटी लागणे, उन्हात फिरल्यास पित्त वाढणे, गवत-झाडीतून फिरल्यास रॅशेस उठणे इ त्रासांना नेहमीच टाळता येणं शक्य नसलं तरी उपाय करता येतात. सर्वासाधारणपणे एक फ़र्स्ट-एड बॉक्स एकाकडे असावा. त्यात ताप-सर्दी-पित्त यावरच्या गोळया, भाजल्यास-खरचटल्यास लावायचे मलम, कापूस, बॅंडेज, सोबतीला छोटी कात्री, दोरा, कोरडी फडकी इ साहित्य ठेवावे. ट्रेकमध्ये जबाबदारीने वागल्यास अपघात टाळता येतात हे खरेच. तरीही खबरदारी म्हणून ही औषधे! आणि हो. आपल्याला झेपेले असाच ट्रेक प्लान करा. लोकांना भापवायला जाल तर फ़साल.

१०) सर्वात शेवटी सर्वात महत्त्वाचे, ट्रेकमध्ये निसर्गाला, रानातल्या पशु-पक्ष्यांना, त्यांच्या अधिवासाला धक्का पोहोचेल असे कुठलेही कार्य करू नका. रात्री गोंधळ, गोंगाट, मद्यपान करून धिंगाणा करणे या गोष्टींसाठी ऐतिहासिक किल्ल्यांपेक्षा इतर उत्तम जागा या जगात भरपूर आहेत. दरीतून येणारा वाऱ्याचा आवाज, पक्ष्यांची मंजूळ किलबिल, उन्ह-पावसाचे खेळ, आणि

यातलं काहीच नसेल तरी निखळ आणि नितळ शांतता यातलंही सौंदर्य अनुभवण्यासारखं असतं!

तसेच अशा ऐतिहासिक ठिकाणी स्वत:ची नावे लिहून येण्यासारखा नामर्दपणा दुसरा नाही. दस्तुरखुद्द शिवछत्रपतींचे नाव एकाही गडावर त्यांनी लिहिले अथवा लिहून घेतलेले नाहीये ही गोष्ट पुरेशी सूचक नाही का?

ट्रेकींगच्या आनंददायी अनुभवासाठी डोंगरभर शुभेच्छा!

तर दोस्तांनो,


ही होती मराठ्यांच्या ऐतिहासिक किल्ले माहुलीची ई सफ़र .

पुढच्या अंकात भेटू अशाच एका तुमच्या आमच्या आवडीच्या किल्ल्यावर!

शुभास्ते पन्थान: सन्तु ।


# दुर्ग दुर्घट भारी या मालिकेतील

# पुर्व-प्रकाशित पुस्तकं




किल्ले रायगड

किल्ले बिकटगड





मोहिम पन्हाळगड ते विशाळगड


दुर्ग कोंढाणा उर्फ़ सिंहगड

किल्ले रायरेश्वर आणि केंजळगड

किल्ले पुरंदर

जलदुर्ग खांदेरी उंदेरी



# थोडं घ्या ! थोडं द्या!!

## कोणी पेरलंच नाही तर उगवणार कसं ?

दोस्त !

गेले वर्षभर ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े आम्ही दुर्ग दुर्गट भारी या मालिके द्वारे किल्ल्यांची माहिती जमा करत आणि वितरित करीत आहोत. अनेकांना ती आवडते. तिचा उपयोग करून लोक ट्रेक प्लान करतात.

माधुरी आणि अरविंद नाईक हे आमचे वाचक. त्यांना भटकण्याची आवड होती. आम्ही त्यांना त्यांचे अनुभव लिहायचा आग्रह केला आणि त्यातून ही पुस्तिका तयार झाली.

किल्ल्यांची माहिती इंटरनेटवर देण्याचा हा उपक्रम कसा वाटला ते आम्हाला जरूर कळवा. तसेच आपल्या ट्रेकसाठी या माहितीचा आपल्याला कसा उपयोग झाला तेही जाणून घ्यायला आम्हाला आवडेल. यात अजून काय आणि कशी सुधारणा करता येईल तेही सांगा. तुम्हाला अशी एखाद्या गडाची ओळख करून द्यायला आवडेल? आपण पाहिलेल्या गोष्टी, आलेले अनुभव फ़क्त लिहून द्या. त्यासाठी लेखक वगैरे असण्याची गरज नाही.

या गडाबद्दल किंवा बृहन्महाराष्ट्रातल्या कोणत्याही गड किल्ल्याबाबत आपणाकडे माहिती व फ़ोटो असल्यास कृपया आमच्याशी संपर्क साधा. पुस्तिकांची ही मालिका अधिकाधिक समृद्ध होण्यासाठी आपली मदत हवी आहे. तसेच गडकिल्ल्यांशी संबंधित काम करणारा आपला काही ग्रुप वगैरे असल्यास आम्हाला आपली माहिती कळवा. आपला किंवा आपल्या माहितीतल्या कुणाचा ब्लॉग, वेबसाईट यांचीही लिंक पाठवा. निवडक दर्जेदार लेखन आम्ही आपल्या नावासहित प्रसिद्ध करू.

आज इवलिशी दिसणारी ही पुस्तिका कालांतराने एक संदर्भ ग्रंथ बनावी अशी इच्छा आणि योजना आहे. आणि हे आपल्या मदतीनेच शक्य आहे. नाही का?

आपल्या सर्व प्रकारच्या प्रतिसादांसाठी

लिहा

durgabhari@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठानच्या या पुर्वी प्रसिद्ध झालेल्या ई पुस्तकांसाठी

भेट द्या

www.esahity.com